**सं.फौ.ख.क्र. ११५३/२०२३**
**नि.क्र. २७ लगत**
**योगेश खोपकर वि. अभिषेक कांबळे**

**फिर्यादीतर्फे जादा सरतपास वकील श्री. एरुणकर यांच्या मार्फत सुरु.**

**१)** मी फिर्यादीसोबत दि. १८/०८/२०२३ रोजीचा धनादेश दाखल केलेला आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर धनादेशास **निशाणी ३२** देण्यात येत आहे. सदरचा धनादेश न वटल्यामुळे बॅकेतर्फे मेमो देण्यात आला. सदरचा मेमो दि. १९/१०/२०२३ रोजीचा आहे. त्यास **निशाणी ३३** देण्यात येत आहे. मी वकीलांमार्फत आरोपीला पैसे मागण्याची नोटीस पाठवली. आता मला ती नोटीस दाखवली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व वकीलांची सही आहे. ती नोटीस दि. ०९/११/२०२३ रोजीची आहे. त्यास **निशाणी ३४** देण्यात येत आहे. सदरची नोटीस रजिस्टर पोस्टाने पाठवली. त्या रजिस्टर पोस्टाच्या पावतीला **निशाणी ३५** देण्यात येत आहे. सदरची नोटीस आरोपीला मिळाली. त्याची पोहोच पावती मला दाखवली. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **निशाणी ३६** देण्यात येत आहे. आरोपीने मला हमीपत्र लिहून दिले होते. ते दि. १८/०८/२०२३ रोजीचे आहे. त्याची व्हेरीफाईड प्रत दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यावर आरोपीच्या पत्नीची देखील सही आहे. ती मी ओळखतो. सदर हमीपत्रास **निशाणी ३७** देण्यात येत आहे.

**जादा सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्विकृती
माझे समक्ष,

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2025.12.01 17:47:33 +0530

**( श्रीमती एस.एस.देशमुख )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खालापुर.

ठिकाण:— खालापुर,
दिनांक:— ०१/१२/२०२५.